ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# इंद्रजीत भालेरावांच्या कवितेतील स्त्री दशन

**प्रा. बाळासो आण्णा सुतार,**
**प्रा.बाबासाहेब नाईक**
आबासाहेब मराठे महाविद्यालय, राजापूर, जि. रत्नागिरी

नव्वोदत्तरी कालखंडातील ग्रामीण साहित्य प्रवाहामध्ये स्वत:चा वेगळा ठसा उमटवणारा अस्सल ग्रामीण कवि म्हणून इंद्रजीत भालेराव यांना ओळखले जाते. रिधोरा परभणी जिल्ह्यातील वसमत तालुक्यात त्यांचा जन्म झाला. पारंपारिक पध्दतीने जीवन व्यथित करणाऱ्या या जन्म ठिकाणाचा त्यांच्यावर खूप मोठा परिणाम झालेला दिसतो. आपला सभोवताल जवळचे पारंपारिकत्व त्यांच्या काव्याचा विषय झाला. आपल्या समग्र कवितेत आपला गावगाडा यांचा संस्कार घेवून त्यांची कविता एका नव्या अंकुराने रुजलेली दिसते.

स्वत:च्या कवितेच्या प्रेरणेबाबत ते म्हणतात, "प्रत्यक्ष भोगलेले आणि पाहिलेले शेतकरी जीवनाचा वास्तव हाच माझ्या कवितेची मुख्य भूमिका आहे असे त्यांना वाटते." कवितेवर लोकसाहित्याची परंपरा पगडा व भजन, सणावारांची गाणी, जात्यावरच्या ओव्या,या साऱ्यांच्या प्रभावातून त्यांची कविता ओवी छंदातून अवतरते.

त्यांच्या कवितेतून अस्सल मातीचा गंध दरवळत राहतो. या दरवळाला जसा मातीचा साज आहे तितक्याच मोठ्या प्रमाणावर त्यांच्या आईने केलेल्या लोकसाहित्याच्या संस्काराचाही प्रभाव आहे. आपल्या कवितेने त्यांनी अनेक ग्रामजीवनाचे कांगोरे, शेतशिवारातील कामे , त्याच्याशी निगडीत अनेक प्रथा परंपरा यांचा उहापोह केला आहे. या सवासोबतच समाजातील समाजदशनाचा भाग त्यांच्या कवितेत येतो. इंद्रजीत भालेराव यांनी आपल्या कवितेत स्त्री चित्रणाला स्थान दिलेले आढळते.

त्यांच्या पहिल्या 'पीकपाणी' या कवितासंग्रहात 'आस्सी आली लम्हाणीन' या कवितेत लम्हाण जातीतील स्त्री व्यक्तीरेखेचे चित्रण केले आहे. लमान जातीतील तिच्या दिसणे, असणे कवि म्हणतो "आस्सी आली लम्हाणीन" झट्या झांबत झाजला | तिचे वणन करताना कवि तिचे दृश्य रूप आपल्या समोर कवि उभे करतो. हा लम्हाणीनीच्या काचोळीला आरसे काठोकाठ भरलेले आहेत. असे मनोहर रूप त्यांनी चितारले आहे.

याच संग्रहात 'माझं तुटलं' ही कविता माहेरातून ताटातुट झालेल्या स्त्रीच्या वेदना प्रकट करते. माहेरच्या माणसातील ओलावा नष्ट झाल्यावर होणारी तगमग कवींनी माहेरवासनीच्या मनाने भावनाआविष्कार केला आहे.कवितेच्या शेवटी ते म्हणतात,

"माझ काळीज मासोळी

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

होत पाण्यान झाकल
माझ तुटल माहेर
पाणी तळच फाकल”

ग्रामीण कवितेला कळसावर पोहवणारा बहिणाबाई चौधरी यांच्या बद्दल आदर वकट करताना तिच्या कवितेतून प्रेरणा घेणारा हा कवि म्हणतो

‘तुला माणुसकी ठाव
तुला माणसाची हाव
गाण तुह नित घेई
माझ्या हिरातांचा ठाव’

प्रेमाचा आविष्कार कवीने आपल्या खास ग्रामीण शैलीत केलेला दिसतो.

“अस्सी लाजू नको येडे, भिजू नको पावसात
बस खेटून जवळ, नाही कोणाला दिसत”

त्यांच्या ‘काबाडाचे धनी’ या काव्यसंग्रहात हातात काठी घेतलेली, रापलेली, वाकलेली, जपमाळ करणारी, सुरकुत्या अंगावर पडलेली अशी आजी हूबेहूब चित्रीत केलेली आहे. या आजीच्या चित्रणासोबतच स्वताच्या आईचे सुंदर चित्रणही त्यांनी केले आहे. कुळंबिन म्हणून तिचे जगणे कवि मांडतो.

माय उभी पाताळात उंच आभाळाएवढी
दुष्काळात वाहणारी नदी सुखाळी एवढी

अनेक कवींनी आईचे चित्रण केले आहे इंद्रजीत भलेरावांनी आपल्या आईचे केलेले चित्रण खास ग्रामीण शैलीत उठावदारपणे केले आहे. या आईच्या चित्रणाबरोबरच बाभिचे चित्रण अगदी खूप कमी शब्दात संपूण भाभीचे अंतरंग शब्दबध्द करताना ते म्हणतात.

‘आली नवीनवी भाभी मला म्हणी रावसाब
अरेतुरे च्या जिन्याला आला थोडा फार आब’

वहिनी सोबतच या कवितासंग्रहात बहिणीचे चित्रणही कवि करतात. शेळ्या राखणारी बहीण, आता संसाराचा डाव मांडते आहे तिच्या मुखातील गाणी आता मुकी मुकी झाल्यासारखी कवीला वाटतात. पुढे कवि सगुणा नवरीचे चित्रण कवि खूप सुंदर करतो. आली घरात सगुणा उजळल्या चंद्रज्योती सांदी कोपऱ्यात झालं घरं उजेडाच्या वाती ही हास्य घेवून आलेली सगुणा निवेदकाच्या जिवाची मात्र भिंगरी करते. तिच्या धीटपणाच्या गोष्टींचा आठव

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

करताना कवीला गिरजाक्काची आठवण होते बाबळीच्या डेऱ्याखाली जेवू घालणारी गिरजाक्का लेखकांच्या अखंड स्मरणात राहते.

'कुळंबिणीची कहाणी' स्त्री परंपरा संस्कृती पल्याड स्वसामर्थ्याने उभ्या राहणाऱ्या स्त्रीचे गीत कवि या दीर्घ काव्यात मांडतो. मुलगी होणे शेतकऱ्याला नकोशी असते. या पाठीमागचे अर्थशास्त्र लक्षात घेता हुंडा व आपल्या मुलीला कष्टाला जुंपू नये, तिचा जाच होवू नये ही तिच्या बापाची इच्छा असते. वरील स्त्रियांबरोबरच त्यांनी त्यांची विधवांचं हिम्मतीने जगणे समाजव्यवस्थेने मुलीला दिलेली वागणूक, मुलीच्या लग्नाचा आईबापाला लागलेला घोर शेतकरी राजा असतानाही आपल्या तारुण्य सुलभ भावनांना धगधगत्या वास्तवात घालावी लागणारी मुरड रया गेलेले गाव आणि या गावात तडजोड करणारी स्त्री व तिच्या वाट्याला आलेलं कोपऱ्यातील पोकळी सारखे जगणं कवि तितक्याच ताकदीने मांडतो. माहेरच्या इज्जतीला लागूदेऊ नये बट्टा रेटावं जगणं धीडा काळजावं ठेवू मोठ्ठं असं संस्कृतीच्या नावाखाली सतातची टांगती तलवार डोक्यावर घेवून ग्रामसंस्कृती विश्वास यातून जगण्याचा आधार शोधताना इंद्रजीत भालेरावांच्या कवितेतील स्त्री दिसते. ही स्त्री दुखातून स्वताला सावरते. स्वता उभी राहते. "चारदिस रडूरडू केला आकांत सासूने मग खोसून पदर डोळे टाकले पुसून" सुखी संसाराची चित्र उभे करताना मनातील रेशीमधागे त्यांनी उमटले आहेत. पती पत्नी संबंधाचे हळुवार चित्रण करून मोहरलेल्या फांदीचं वाऱ्यावर बागडण कवीने अचूक टिपले आहे. कुटुंब निर्मितीची कहाणी सांगताना दुगाई ताळीन डॉक्टर स्त्रीचे हातगूण गर्भधारणेपासून व त्यामुळे हे सुखी संसाराचे चित्रण आले आहे. या कवितासंग्रहातून केले आहे. बहीण भाऊच्या नाट्याची एक वेगळीच मिळ व लेकीच्या दु:खाची प्रतीनिधी कहाणी कवि इंद्रजीत भालेरावांनी केले आहे.

एका पोक्त ग्रामीण स्त्रीची कहाणी भालेराव आपल्या काव्यातून करतात. विवेक जोग म्हणतात. "अनेक स्त्रीवादी संघटन प्रणाली जे कधी कंठरवाने सांगून जाते तेच येथे अगदी अलगद आणि अमोल शब्दात कवि मांडून जातो." भालेरावांच्या कविता शेतकऱ्याच्या शिवारातून शेतकऱ्याच्या घामातून वाटचाल करते. स्त्री जन्माच्या व्यथा वेदनांमध्ये रमते आणि तिच्या जगण्याच्या वेदनाही सहन करते. आणि सुंदर जीवनाचे स्वप्न पाहते. विधवांच्या डोक्यातील असाहय्यता, कारुण्य यांचा अर्थ त्यांच्या काव्यपंक्तीतून अवतरतो. शेतकरी स्त्रीच्या दिवसभराच्या कामाचे साधे सरळ वर्णन 'कुळंबिन' या कवितेत भालेराव करतात. शेतकरी स्त्रीच्या जगण्याचे हे वास्तववादी तपशील जगण्याचे पीळ पारंपारिक जगणं याचा प्रत्यय या काव्यातून येतो स्त्रीच्या जगण्याचे भावविश्वाचे संपूर्ण तपशील अगदी नात्यागोत्यासह मग त्यामध्ये भावजई,नणंद,नवऱ्याशी होणारे आणि फक्त स्त्रीलाच माहिती असणारे वर्तनाचे

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

तपशील या काव्यात दिसतात. स्त्रीच्या जगण्याचे सवच कांगोरे भलेरावांनी आल्या काव्यात चित्रित केले आहेत. या जगण्याची आदिम लय, सासर, माहेर यामधील संस्कृतीने तयार झालेले अंतर नाते संबंधातील आपुलकी, भयानकता या सवाना ती आपलीशी करते. कवि इंद्रजीत भालेराव यांनी ग्रामीण स्त्रीच्या जीवनाची झालेली पडझड, अतिशय प्रभावी रातीने आपल्या काव्यात व्यक्त केली आहे. समाजातील स्त्रीचे स्थान पशुपेक्षाही खालचे आहे तिचा क्रूर असा छळ केला जातो. अन्याय, अनीति, गुलामगिरी आणि शोषण यामध्ये तिची पिळवणूक झाली आहे यातच तिची शक्ति हान करून तिला अपार कष्ट आणि चिरंतर वेदनेत पिचतच ठेवली आहे. सेवा, संवधन, सातत्य, वात्सल्य, प्रेम यांचे अखंड अभिदान करणाऱ्या स्त्रीला व्यवस्थेने व परंपरेने गुलाम बनविले आहे. अश्या स्त्रीची ही वेदना 'बाईच्या जातीचे काहीच खरं नसतयं, काहीच तिच्या स्वाधीन नसतयं, बाप ज्या दावणीला बांधील ती तिच्या जन्माची दावण, मग ती खाती गव्हाण असू का,खाटकाची गव्हाण असू दावणीच्या बिलयातून मग तिची सुटका नाही.' हे स्त्री जीवन ग्रामीण जीवनाची ससेहोलट, आणि तिच्या जीवनाचे कांगोरे भालेरावांनी आपल्या कवितेतून चित्रित केली आहे. हे ग्रामीण स्त्रीचेदशन, जीवनदशन वाचकाला अस्वस्थ करते.

**संदभग्रंथ :**

१. पीकपाणी, मेहता प्रकाशन प्रथमावृत्ती, २००१
२. त्रिफनसाज, इंद्रजीत भालेराव मनोविकास प्रकाशन तिसरी आवृत्ती,२००८
३, कुळंबिनीची कहाणी, इंद्रजीत भालेराव, प्रतिभास प्रकाशन, तिसरी आवृत्ती,२००७
४. आम्ही काबाडाचे धनी, इंद्रजीत भालेराव, प्रतिभास प्रकाशन, पहिली आवृत्ती,२००८
५. विवेक जोग फेब्रु १९९९